ISBN 978-93-82504-77-1

# १९९० नंतरचे मराठी वाङ्मयातील विविध प्रवाह

संपादक
डॉ. युवराज धबडगे

सह संपादक
प्रा. बोंतेवाड नागेश रामलू

# १९९० नंतरचे
# मराठी वाङ्मयातील विविध प्रवाह

©प्राचार्य
**डॉ. कल्याण लघाने**
दगडोजीराव देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
वाळूज, औरंगाबाद (महाराष्ट्र)

प्रकाशक
**न्यू वाइसेस पब्लिकेशन,**
हेड पोस्ट ऑफिस, जुना बाजार, औरंगाबाद-431001

प्रकाशक :
**वेल्डन ग्राफिक्स ॲण्ड डी.टी.पी.**
मंजूरपुरा, औरंगाबाद.

मुद्रक :
**ओंकार प्रिंटर्स,**
सिडको, औरंगाबाद

प्रथम आवृत्ती : (फेब्रुवारी २०१७)

किंमत : ३००/-

या पुस्तकात प्रकाशित झालेल्या सर्व लेखातील विचार संबंधित लेखकांचे असुन या विचारांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही

**ISBN 978-93-82504-77-1**

१९९० नंतरची ग्रामीण कादंबरी
**प्रा. शिवाजी सिरसाठ** २०३

१९९० नंतरची निवडक कथा
**प्रा.डॉ.रमेश श्रीरंग औताडे** २०७

१९९० नंतरची मराठी विज्ञानकथा
**प्रा. गिरी शिवचरण प्रभाकर** २११

१९९० नंतरची उत्तम बंडू तुपे यांची कथा
**प्रा. कातकडे केशव श्रीरंग** **प्रा. गजलवार रमाकांत काळबाराव** २१४

आमचा बाप अन् आम्ही: एक आकलन
**शीला भावजी दाभाडे** २१७

स्त्रीदास्य झुगारून देणारी कांता शिंदे यांची परिवर्तनवादी कविता
**डॉ.मारोती कसाब** २१९

१९९० नंतरची दलित कविता आणि विद्रोह
**डॉ. शंकर वाघमारे** २२२

प्रेम अन् जबाबदारीचा अद्भूत मिलाफ : आमचा आलेख कोराच
**श्री.मधुकर बालासाहेब जाधव** २२६

तीन दगडांची चूल मधील पुरुषी दृष्टिकोन
**प्रा. सारिका अशोकराव बुरगे** २२९

साहित्य समाज आणि स्वातंत्र्य वैचारिक लेख संग्रहाचे आकलन
**प्रा.नवनाथ ज्ञानोबा पवळे** २३२

नव्वदोत्तर मराठी कविता
**प्रा. एम.एस. जगताप** २३५

वारुळ : नवदोत्तर साहित्यातील वेगळा प्रवाह
**प्रा.डॉ.पंढरी डोईफोडे** २४१

१९९० नंतरचे मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरुप
**प्रा. योगेश डी.पाटील** २४५

# नव्वदोत्तर मराठी कविता

प्रा. एम.एस. जगताप

**प्रास्ताविक :**

१९९० नंतरचा कालखंड हा खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या कालखंडात जागतिकीकरणासारख्या संबंध जगाला व्यापून टाकणाऱ्या आणि परस्पर घटकांशी संबंधित असणाऱ्या घटना घडल्या. यामध्ये माहितीतंत्रज्ञानाचा झालेला स्फोट, प्रसारमाध्यमांचा वाढलेला पसारा, संगणक क्षेत्राचे पसरलेले जाळे, जाहिरात, मार्केटिंग, क्रयवस्तूला आलेले महत्व, पैसाउपभोक्ता या मूल्यांची झालेली वाढ, माणसांची बदललेली जीवनशैली अशा अनेक गोष्टींचा समावेश केला जातो. या घटनांचा मानवी समाजजीवनावर खोलवर प्रभाव पडल्याचे दिसून येते. सन १९९१ मध्ये भारताने खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला आणि तेथून पुढे जागतिकीकरणाची प्रक्रिया भारतीय समाजात सुरू झाली. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे बाजारपेठेचे तंत्र बदलले. या बाजारपेठेच्या बदलत्या तंत्रातून आपल्या देशात विदेशातील मॉल संस्कृती आली. एकाच ठिकाणी सर्व जीवनोपयोगी वस्तू मिळण्याची सोय झाली. वेळेची बचत झाली असे वाटू लागले. खरेदी केलेल्या वस्तू जीवनोपयोगी व दर्जेदार असल्याचे समाधान प्राप्त झाले. यातूनच भौतिक चंगळवाद वाढीस लागला. टी.व्ही., संगणक, मोबाईल, इंटरनेट या चंगळवादी वस्तूंचा मानवी जीवनावर परिणाम झाला. या परिणामातून माणसे जवळ येण्याऐवजी एकमेकांपासून दूर जाऊ लागली. शिक्षणाचे खाजगीकरण झाले. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे सुशिक्षित बेकारांची संख्या वाढली. वाढत्या औद्योगिकीकरणाचा परिणाम महानगरावर झाला; तसाच तो ग्रामीण आणि दलित जीवनावरही घडून आला. खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांच्या जीवनाचे अनेक प्रश्न उपस्थित झाले. अशा असंख्य प्रश्नांचा व बदलत्या समाज वास्तवाचा फार मोठा परिणाम या काळातील साहित्यिकांवर व त्यांच्या साहित्यावर झाल्याचे दिसून येते. किंबहूना जागतिकीकरणाच्या लाटेत माणसांचे जगणे अंतर्बाह्य बदलल्यामुळे साहित्याचा चेहरा मोहराही बदलला गेल्याचे दिसून येते.

मराठी साहित्याचा विचार करता जागतिकीकरणाच्या बदलाचा परिणाम सर्वप्रथम कवितेतून अधोरेखित होताना दिसून येतो. या बदलाच्या स्पष्ट खुणा मराठी कवितेत ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी या प्रवाहातील कवितेतून पाहावयास मिळतात. नव्वदोत्तर कवितेचा परामर्श घेताना श्रीकांत देशमुख, इंद्रजित भालेराव, संतोष पवार, प्रकाश होळकर, शशिकांत शिंदे, लक्ष्मण महाडिक, सदानंद देशमुख, केशव देशमुख, विरधवल परब, बालाजी मदन इंगळे, महेंद्र भास्कर पाटील, सोपान हाळमकर, महेश केळूसकर, अजय कांडर, अरूण काळे, उत्तम कांबळे, अरूण कांबळे, विवेक मोरे, सुभाष थोरात, महेंद्र गायकवाड, सुरेश कांबळे, डी.बी. जगतपुरीया, संभाजीराव भाले,